# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. २९९/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १२/०६/२०१८

**१) माल वाहक वाहन चोरुन नेल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ०९/०६/२०१८ चे २२.०० ते १०/०६/२०१८ चे ०६.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी रवि शंकरराव नगरे वय ४२ वर्ष, रा. विनोबा नगर कीर्ती गार्डन जवळ तुमसर याचे घरा समोर खुल्या जागेत ठेवलेला फिर्यादीचे मालकीची माल वाहक टाटा डि. आय. २०७ आर. एक्स क्र. एमएच ४८ जी ०९२९ किंमती १,५०,०००/—रु. चे वाहन कोणीतरी अज्ञात चोराने कुणीही नसल्याची संधी साधुन चोरुन नेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३७९ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. बावणे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) शाळेतील ईलेक्ट्रीक साहित्याची चोरी :—**

दिनांक १०/०६/२०१८ चे १८.०० ते ११/०६/२०१८ चे ०७.३० वाजता दरम्यान यातील कोणीतरी अज्ञात आरोपीने फादर ॲगल शाळा देव्हाडी रोड तुमसर येथील शाळेचे मागील गेटचा ताला तोडुन आत प्रवेश करुन शाळेचे रुम मध्ये ठेवलेले ४ संगनक, ४ मॉनीटर, ४ सि.पी.यु, २ एम्पीफायर, १ माईक असा एकुण ५२,०००/—रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी फादर अँनथोनी कारगोट वय ५२ वर्ष, रा. फादर ॲगल शाळा तुमसर यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ४५७,३८० भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. जटाळ पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**३) तांदळाचा अपहार करुन बनावट दस्ताऐवज खरे म्हणुन वापरुन शासनाची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :—**

सन २०११/ २०१२ चे खरीप हंगाम ते ११/०६/२०१८ पर्यत यातील सर्व आरोपी हे नमद राईसमिलचे मालक असुन आरोपींना शासनाने धान भरडाई करीता दिलेल्या धानाची भरडाई करुन आदेशातील अट क्र. २ मधील १ नुसार भरडाई केलेला ६७ टक्के तांदुळ नमुद आरोपीतांनी भारतीय महामंडळाचे गोदामात जमा करणे बंधनकारक असतांनाही सर्व आरोपीतांनी कट करुन त्यांचेकडे शासनाने विश्वासने सोपविलेल्या धानाची शासनाच्या स्वाधीन न करता स्वत:चे ताब्यात अप्रामणीक ठेवुन तांदळाची स्वत:च्या फायदया करीता विल्हेवाट लावुन शासनाची फसवणुक करुन बनावट दस्ताऐवज खरे म्हणुन वापरुन शासनाचे एकुण ६२,९९६.२१ क्विंटल तांदळाचा अपहार करुन किं १२ कोटी २० लाख ९६ हजार ७३१/—रु. ची नमुद सर्व आरोपीतांनी फसवणुक केल्याची फिर्यादी गणेश तुकाराम खडसे वय ३८ वर्ष, रा. भंडारा (पनन अधिकारी भंडारा) यांचे लेखी तक्रार दिल्याने पोलीस स्टेशन वरठी येथे कलम १२०(ब),४०६,४०८,४०९,४२०,४३४,४६५,४६७,४६८,४७१ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. ढोबळे पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४) ट्रेलर चालकांच्या निष्काळजीपनामुळे दोन गंभिर जखमी व टवेरा गाडीचे नुकसान झाल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक ११/०६/२०१८ चे २०.०० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन समोरुन येणारी मोटार सायकल क्र. एमएच ०३/पी ६४६६ ला मोठा पुलीया कारधा शिवार येथे धडक दिल्याने त्यावरील मोटार सायकल स्वार समोरील टवेरा गाडी क्र. एमएच ३४ बीबी ०२४१ वर आदळल्याने टवेरा गाडीचे ३०,०००/—रु. चे नुकसान होण्यास व मोटार सायकल वरील जखमी मिलींद खोत व सौ. अनिता मिलींद खोत यांना किरकोळ व गंभिर दुखापत होण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी उमेश श्रावण देव्हारे वय ४० वर्ष, वाल्मीक नगर ब्रम्हपुरी यांचे तोंडी व जखमीचे परिक्षण रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम २७९,३३७,३३८ भादवी. सहकलम १८४ मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन डोक्यावर विटाने मारुन लाकडी दांडयाने पायावर मारुन मारण्या पिटण्याची धमकी दिली. :—**

दिनांक १०/०६/२०१८ चे २०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी शुभम दिपक मिश्रा वय २३ वर्ष, रा. बपेरा याचे दिनांक ०९/०६/२०१८ ला आरोपी क्र. १ सोबत तोडातोंडी भांडण झाल्याचे कारणा वरुन आरोपी क्र. १ व ईतर ३ ईसम यांनी मिळुन फिर्यादीचे डोक्यावर विटाने मारुन तसेच लाकडी दांडयाने पायावर मारपीट करुन शिवीगाळ करुन मारण्या पिटण्याची धमकी दिल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम २९४,३२३,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन सिहोरा हे करीत आहेत.

**६) संगनमत करुन पेट्रोल न देण्याचे कारणावरुन अश्लिल शिवीगाळ मारपीट करुन पुढे मारण्याची धमकी दिली. :—**

दिनांक १०/०६/२०१८ चे १०.३० वाजता दरम्यान यातील फिर्यादी निलेश ईसराव भैसारे वय २४ वर्ष रा. इंदीरा वार्ड सावरी हा आपले सहकारी कर्मचाऱ्या सोबत बिसीएल पेट्रोल पंपच्या कॅबीन मध्ये जेवन करीत असतांना यातील आरोपी हा त्याचे तिन मित्रासह चारचाकी गाडीने पेट्रोल पंपवर येवुन फिर्यादीस पेट्रोल मागीतले असता फिर्यादीने यातील आरोपीतांना मी जेवन करीत आहे. थोडा वेळ थांबा असे बोलला असता आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीस अश्लिल शब्दात शिवीगाळ करुन थापड बुक्यांनी मारपीट करुन पुढे मारण्याची धमकी देवुन ढकलढुकल केल्याने फिर्यादी हा पेट्रोल पंपचे कॅबीनवर पडल्याने डावे हाताचे भुजेला मार लागुन जखमी झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम २९४,३२३,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. कांबळे पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**७) धान खरेदी करुन व मिलींग करुन तांदुळ जमा न करता शासनाचा विश्वासघात करुन शासनाची फसवणुक केल्याने गुन्हा नोंद :–**

सन २०११ ते २०१२ पर्यत यातील शासनाने आधारभुत कि. खरेदी योजने अंतर्गत हंगाम सन २०११ ते २०१२ मध्ये बिगर आदीवासी क्षेत्रात धान भरड धान्य खरेदी करण्याकरीता दि. महा. स्टेट को. ऑपरेटीव्ह मार्केटींग फेडरेशन ली. मुंबई ९ जिल्हा पनन अधिकारी कार्यालय भंडारा यांनी सम्मती व्द्वारे अटी शर्ती नुसार नियुक्त केले होते. यातील आरोपीला शासनाने धान खरेदी करुन दिले व त्याचे मिलींग करुन ६७ टक्के तांदुळ जमा न करता शासनाचा विश्वासघात करुन अपहार करुन ६९,६१३/–रु. ची फसवणुक केली आहे. अश्या फिर्यादी गणेश तुकाराम खडसे वय ३८ वर्ष, रा. भंडारा यांचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम ४०६,४०९,४६५,४६७,४६८,४७०,४२०,४३४,१२०(ब) भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. गेडाम पोलीस स्टेशन मोहाडी हे करीत आहेत.

**८) इसमाचा मृत्यु :–**

दिनांक ११/०६/२०१८ चे ०५.३० वाजता यातील फियादी जितेन्द्र नामदेवराव चकोले वय ३७ वर्ष, रा. सुभाष वार्ड गणेशपुर भंडारा याचा मित्र मृतक शामराव तुकाराम सोनटक्के वय ३८ वर्ष रा. आदर्श नगर कारधा याची अचानक प्रकृती खराब झाल्याने त्यास सामान्य रुग्नालय भंडारा येथे भरती केले असता तेथील डॉ. नी तपासनु मृत घोषीत केल्याने फिर्यादी जितेन्द्र नामदेवराव चकोले वय ३७ वर्ष, रा. सुभाष वार्ड गणेशपुर भंडारा यांचे तोंडी व डॉ. मेमो वरुन पोलीस स्टेशन कारधा येथे कलम १७४ जाफौ. अवये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पोलीस स्टेशन कारधा हे करीत आहेत.

**९) आमरोड वर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :–**

दिनांक ११/०६/२०१८ चे १५.३० वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील ऑटो वाहन हा बावणकर चौक तुमसर येथे सार्वजनिक रोडवर येणा–या जाणा–या वाहतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या रितीने ऊभे करुन मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. धावळे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. धावळे पोलीस स्टेशन तुमसर करीत आहेत.

**१०) अवैध हातभट्टी व देशी दारु / अडड्यांवर धाडी . :–**

दिनांक ११/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन जवाहरनगर, मोहाडी, करडी व तुमसर येथे हातभट्टी दारु अड्डयावर धाडी घालुन ०४ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ५५ लिटर हातभट्टी दारु + १७६ किलो सडवा मोहा+ साहित्य किंमती १३,२८०/–रु. ३ लिटर २८०मिलीलिटर विदेशी दारु + साहीत्य किंमती २५९५/–रु. असा एकुण १५,८७५/–रु. चा माल जप्त करण्यात आला.

**११) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक ११/०६/२०१८ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७४ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनाकरीता– ०५ ईतर वाहनांवरती – ६९ केसेस करण्यात आले आहे.

PSI

(मपोउपनि.प्रणती लांजेवार)
माहिती कक्ष भंडारा
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.